**सं.फौ.ख. क्र. ८५७/२०१७**
**कुसुम वि. गणेश**
**नि.क्र. ३१ पुढे सुरु.**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ ची पुढील सरतपासणी शपथेवर सुरु**
**फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री यु.एच.सणस**

मी प्रस्तुत प्रकरणाचे कामी माझे साक्ष शपथपत्र दाखल केले असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगण्यानुसार माझ्या विधिज्ञांनी संगणकीकृत केला असुन तो बरोबर आहे.

२. आरोपी आणि माझ्यामध्ये सोनगिरवाडी येथील जमिन खरेदी विक्रीचा व्यवहार ठरला होता. त्यानुसार मी आरोपीला र.रु.२,९०,०००/– दिले होते. तथापी तो व्यवहार पूर्ण न झालेने आरोपीने मला ती रक्कम परत दयायची होती. त्याकरीता त्याने मला प्रस्तुत प्रकरणात र.रु.१,२०,०००/– चा आयडीबीआय बँक शाखा वाई येथील धनादेश क्र. ३१९३७१ दिला. तो धनादेश दि.३०.१०.२०१७ रोजीचा होता. आता मला तो मुळ धनोदश दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची सही असून मी ती ओळखते कारण ती सही त्याने माझ्यासमक्ष केली आहे. सदरील धनादेश त्याने मला घरी येवुन दिला होता. तो धनादेश **नि.क्र.३३** वर आहे. सदरहु धनादेश मी बँकेत सादर केला होता. तथापी तो न वटता परत आला. त्या बाबतचा संबंधीत बँकेने दिलेला चेक रिटर्न मेमो आता मला दाखविण्यात आला. तो तोच असून त्यावर संबंधीत बँकेचा शिक्का व अधिका–याची सही आहे. तो **नि.क्र.३४** वर आहे. धनादेश अनादरीत झाल्यामुळे दि.२८.११.२०१७ रोजी आरोपीस कायदेशीर नोटीस पाठविण्यात आली. त्या नोटीसीची स्थळप्रत आता मला दाखविण्यात आली. त्यावर माझी तसेच माझे विधिज्ञ श्री यु.एच.सणस यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. ती

स्थळप्रत **<u>नि.क्र.३५</u>** वर आहे. सदरील नोटीस असलेले लखोटे आरोपीने न स्वीकारल्यामुळे ते परत आले. ते आता मला दाखविण्यात आला. ते तेच असून तो बंद लखोटे अनुक्रमे **<u>नि.क्र.३६ व ३७</u>** वर आहे. (यावेळी सदरहु बंद लखोटे खुल्या न्यायालयात उघडण्यात आले.) त्यातील मुळ नोटीसींच्या प्रत आता मला दाखविण्यात आल्या. त्या अनुक्रमे **<u>नि.क्र.३८ व ३९</u>** वर आहेत.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री आर.एच.भोसले**

३. हे म्हणणे खरे आहे की आरोपी मेणवली गावचा रहिवाशी आहे व मी गंगापुरी वाई येथे राहते.

**प्रकरण उर्वरीत उलटतपासाकरीता तहकुब.**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

*स्वाक्षरी/-*

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- ०४/१२/२०२३ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई